Gajanan Maharaj Bavanni

जय जय सदगुरू गजानना | रक्षक तूची भक्तजना ||१||
निर्गुण तू परमात्मा तू | सगुण रुपात गजानन तू ||२||
सदेह तू, परी विदेह तू | देह असून देहातीत तू ||३||
माघ वद्य सप्तमी दिनी | शेगावात प्रगटोनी ||४||
उष्ट्या पत्रावळीनिमित्त | विदेह्त्व तव हो प्रगट ||५||
बंकट लालावरी तुझी | कृपा जाहली ती साची ||६||
गोसाव्याच्या नवसासाठी | गांजा घेसी लावून ओठी ||७||
तव पद तीर्थे वाचविला | जानराव तो भक्त भला ||८||
जानाकीरामा चिंचवणे | नासवोनी स्वरूपी आणणे ||९||
मुकीन चंद्रूचे कानवले | खाउन कृतार्थ त्या केले ||१०||
विहिरी माजी जलविहीना | केले देवा जल भरणा ||११||
मध माश्यांचे डंख तुवा | सहन सुखे केले देवा ||१२||
त्यांचे काटे योगबले | काढुनी सहजी दाखविले ||१३||
कुस्ती हरीशी खेळोनि | शक्ती दर्शन घडवोनी ||१४||
वेद म्हणुनी दाखविला | चकित द्रविड ब्राह्मण झाला ||१५||
जळत्या पर्यकावरती | ब्रह्मगीरीला ये प्रचीती ||१६||

टाकळीकर हरिदासाचा | अश्व शांत केला साचा ||१७||

बाळकृष्ण बाळापुराचा | समर्थ भक्तची जो होता ||१८||

रामदास रूपे त्याला | दर्शन देवोनी तोषविला ||१९||

सुकलालाची गोमाता | द्वाड बहुत होती ताता ||२०||

कृपा तुझी होताच क्षणी | शांत जाहली ती जननी ||२१||

घुडे लक्ष्मण शेगावी | येता व्याधी तू निरवी ||२२||

दांभिकता परी ती त्याची | तू न चालवोनी घे साची ||२३||

भास्कर पाटील तव भक्त | उद्धरलासी तू त्वरित ||२४||

आज्ञा तव शिरसावंद्य | काकही मानती तुज वंद्य ||२५||

विहिरीमाजी रक्षियला | देवा तू गणू जवऱ्याला ||२६||

पिताम्बराकरवी लीला | वठला आंबा पल्लवीला ||२७||

सुबुद्धी देशी जोश्याला | माफ करी तो दंडाला ||२८||

सवडद येथील गंगाभारती | थुंकूनी वारिली रक्तपिती ||२९||

पुंडलिकाचे गंडांतर | निष्ठा जाणून केले दूर ||३०||

ओंकारेश्वरी फुटली नौका | तारी नर्मदा क्षणात एका ||३१||

माधवनाथा समवेत | केले भोजन अदृष्ट ||३२||

लोकमान्य त्या टिळकांना | प्रसाद तूची पाठविला ||३३||

कवर सुताची कांदा भाकर | भक्शिलीस तू प्रेमाखातर ||३४||

नग्न बैसोनी गाडीत | लीला दाविली विपरीत ||३५||

बायजे चित्ती तव भक्ती | पुंडलीकावरी विरक्त प्रीती ||३६||

बापुना मनी विठ्ठल भक्ती | स्वयं होशी तू विठ्ठल मूर्ती ||३७||

कवठ्याच्या त्या वारकऱ्याला | मरीपासुनी वाचविला ||३८||

वासुदेव यती तुज भेटे । प्रेमाची ती खुण पटे ।।३९।।

उद्धट झाला हवालदार । भस्मीभूत झाले घरदार ।।४०।।

देहान्ताच्या नंतरही । कितीजणा अनुभव येई ।।४१।।

पडत्या मजूरा झेलीयेले । बघती जन आश्चर्य भले ।।४२।।

अंगावरती खांब पडे । स्त्री वांचे आश्चर्य घडे ।।४३।।

गजाननाच्या अद्‌भुत लीला । अनुभव येती आज मितीला ।।४४।।

शरण जाऊनी गजानना । दुःख तयाते करी कथना ।।४५।।

कृपा करी तो भक्तांसी । धावून येतो वेगेसी ।।४६।।

गजाननाची बावन्नी । नित्य असावी ध्यानी मनी ।।४७।।

बावन्न गुरुवारी नेमे । करा पाठ बहु भक्तीने ।।४८।।

विघ्ने सारी पळती दूर । सर्व सुखांचा येई पूर ।।४९।।

चिंता साऱ्या दूर करी । संकटातूनी पार करी ।।५०।।

सदाचार रत सद्भक्ता । फळ लाभे बघता बघता ।।५१।।

भक्त बोले जय बोला । गजाननाची जय बोला ।।

जय बोला हो जय बोला । गजाननाची जय बोला ।।५२।।

Download All Type PDF: https://pdfseva.com/